महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर५३९, राजेंद्रनगर,कोल्हापूर - ४१६ ००४.

दुरध्वनी क्र - ०२३१ - २६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/ए-१ गोपनीय/प्रा.प./691
कोल्हापूर-४१६ ००४
दिनांक - २०.०२.२०२५
21 FEB 2025

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर.

विषय:- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी ) फेब्रुवारी-मार्च २०२५ चे प्रात्यक्षिक,तोंडी व श्रेणी अंतर्गत ( Practical & Internal) मूल्यमापनाचे साहित्य जमा करणेबाबत.......

संदर्भ - १) या कार्यालयाचे पत्र क्र.कोविमं/ए-१ गोपनीय/प्रा.प/३८९८ चे पत्र.
२) राज्य मंडळाचे पत्र क्रं.रा.मं./परीक्षा-२/४२५ दिनांक ३०/०१/२०२५ चे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) फेब्रु-मार्च २०२५ प्रात्यक्षिक,तोंडी व श्रेणी च्या परीक्षा **दिनांक ०३.०२.२०२५ ते दिनांक २०.०२.२०२५** पर्यंत पूर्ण करण्याबाबत संदर्भिय पत्र क्रं १ नुसार कळविण्यात आले आहे. त्याप्रमाणे प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत ( Practical & Internal) मूल्यमापनाचे गुण ऑनलाईन प्रणालीमध्ये सादर करण्याची अंतिम तारीख शुक्रवार **दि. २८.०२.२०२५** अशी आहे.तरी सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक यांनी **दि. २८.०२.२०२५** पूर्वी ऑनलाईन पध्दतीने गुण भरण्याची कार्यवाही पूर्ण करावी. त्यानंतर संकेतस्थळ (website) बंद करण्यात येणार आहे तद्नंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घेऊन ऑनलाईन प्रणालीमध्ये गुण भरण्याची कार्यवाही करावी.

सदर परीक्षेचे सर्व साहित्य मंडळाने नियुक्त केलेल्या वितरण केंद्रावर **सोमवार दि. ०३.०३.२०२५** रोजी जमा करण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत सदर तारखेनंतर साहित्य स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**प्रत माहितीसाठी -**

सर्व सातारा,सांगली,कोल्हापूर वितरण केंद्रांना कळविण्यात येते की, आपल्या केंद्रावर येणाऱ्या सर्व मान्यता प्राप्त शाळांकडून फेब्रुवारी-मार्च-२०२५ चे प्रात्यक्षिक ,तोंडी ,श्रेणी परीक्षेचे सर्व साहित्य **सोमवार दि. ०३.०३.२०२५** रोजी स्विकारण्यात यावे व सदर साहित्याची शाळानिहाय यादी करुन **बुधवार दिनांक ०५.०३.२०२५** रोजी कोल्हापूर विभागीय मंडळाचे प्रतिनिधी सर्व साहित्याच्या पेटया घेऊन जाण्यासाठी येतील.त्यांचेकडे सर्व साहित्य देण्यात यावे.वितरण केंद्र प्रतिनिधीनी सदर साहित्य संबधित लिपिकांना देण्याकरिता खालील दिनांकास मंडळात हजर राहावे.

**१.सातारा जिल्हा - दि. ०६ .०३.२०२५**
**२.सांगली जिल्हा - दि. ०७.०३.२०२५**
**३.कोल्हापूर जिल्हा (स्थानिक सोडून) - दि. ०८ .०३.२०२५**